अभिनंदन

# ‘पोषक धान्य पुरस्कार-२०२२’ (जीवनगौरव)



# ज्येष्ठ कृषिवैज्ञानिक डॉ. डी.आर. बापट यांचा बहुमान

प्रख्यात कृषिवैज्ञानिक डॉ. डी.आर. बापट यांना अलिकडेच मध्यवर्ती स्तरावरील ‘पोषक धान्य पुरस्कार-२०२२’ प्रदान करण्यात आला. भारतीय कृषी संशोधन संस्थेच्या (आय.सी.ए.आर.) अखत्यारीतील भरडधान्ये संशोधन संस्थेतर्फे (आय.आय.एम.आर.) त्यांना हा ‘जीवनगौरव’ स्वरुपाचा प्रतिष्ठेचा सन्मान लाभला. प्रस्तुत संशोधन संस्था केंद्रीय कृषी मंत्रालयाच्या अधीन आहेत.

आता वयाची नव्वदी पार केलेले, पुण्यात स्थायिक असलेले डॉ. बापट हे एक ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व आहे. राहुरीच्या महात्मा फुले कृषी विद्यापीठात ते संशोधन संचालक होते. ‘महाराष्ट्र असोसिएशन फॉर कल्टिव्हेशन ऑफ सायन्स’ (एम.ए.सी.एस.) या संघटनेचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले आहे.




प्रामुख्याने ज्वारी विशेषज्ञ म्हणून लौकिक असलेल्या डॉ. बापट यांचा संकरित वाण विस्तार कार्यक्रमातही मोलाचा सहभाग होता. तसेच तीन दशकांहून अधिक काळ पारंपरिक धान्य-वाणांच्या संशोधनाचे कार्यही त्यांनी केले. महाराष्ट्रासह काही नजिकच्या राज्यांमध्ये हे विस्तारकार्य झाले. मुख्यत: ज्वारी तसेच बाजरीच्या (पर्ल मिलेट) विविध वाणांचा त्यात समावेश होता. या संदर्भात त्यांनी क्षेत्रनिहाय अनेक प्रशिक्षण कार्यक्रमही आयोजित केले होते.

डॉ. बापट यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या संकरित भरड धान्य वाणांच्या विस्तार कार्यक्रमामुळे खरीप हंगामात शेतकऱ्यांची उत्पादकता तीन ते चार पटीने वाढण्यास मदत झाली.

यामध्ये विशेष नमूद करावयाची बाब म्हणजे, देशभरात तेव्हा झालेल्या हरितक्रांतीला पर्जन्यमानाची अनुकूलता होती. मात्र डॉ. बापट यांच्यासारख्या प्रज्ञावंत आणि कृतिशील वैज्ञानिकांच्या अथक प्रयत्नांमुळे, महाराष्ट्रात कोरडवाहू क्षेत्रात देखील ज्वारी आणि बाजरीच्या पिकांमध्ये लक्षणीय उत्पादनवाढ साध्य झाली, ही प्रशंसनीय उपलब्धी म्हटली पाहिजे.

अशा शास्त्रशुद्ध आणि सुनियोजित कार्यक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीचे फलित म्हणजे १९७४-७५ दरम्यान असलेले ज्वारीचे महाराष्ट्रातील १० ते १२ लाख टनांचे उत्पादन १९९२ मध्ये ५० लाख टनांवर गेले. १९७४ मध्ये असणारे बाजरीचे केवळ ३ ते ४ लाख टन उत्पादन १९९२ ते ९६ दरम्यान १८ लाख टनांवर जाऊन पोहोचले.

डॉ. बापट यांच्या या प्रदीर्घ संशोधन, प्रशिक्षण तसेच विस्तार कार्याची उचित दखल घेऊन त्यांचा बहुमान केल्याबद्दल कृषिक्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. निरामय दीर्घायु जीवनासाठी ‘पूर्वा कृषिदूत’ परिवाराकडून त्यांचं हार्दिक शुभचिंतन. ■